# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (मुख्य) परीक्षा-२०१८
## -- अंतिम निकाल –
## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि.१४ ऑक्टोबर, २०१८ व दि.०४ नोव्हेंबर, २०१८ रोजी **"दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (मुख्य) परीक्षा-२०१८ (जाहिरात क्र. ३९/२०१८)"** एकूण ३३ पदांकरिता घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेसाठी संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेले दावे निकालासाठी विचारात घेऊन सदर दाव्यांच्या अनुषंगाने शिफारसपात्र उमेदवारांची पात्रता शासन स्तरावर, मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, सदर परीक्षेचा निकाल दि. ०८ मार्च, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये **सातारा** जिल्ह्यातील **श्री. सागर लक्ष्मण नलावडे (बैठक क्र.** MB००११२२) हे राज्यात प्रथम आले आहेत. मागासवर्गवारीतून **अहमदनगर** जिल्ह्यातील **श्री. संकेत विजय वामन** (**बैठक क्र.**MB००२००९) तसेच महिलांमध्ये **पुणे** जिल्ह्यातील **श्रीमती स्वाती बबन शिंगाडे (बैठक क्र. MB००१०५८**) ह्या प्रथम आल्या आहेत.

३. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात/मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

४. मा.मॅट,मुंबई व मा.मॅट, औरंगाबाद येथील अनुक्रमे मूळ अर्ज क्रमांक ७८१/२०१८ व मूळ अर्ज क्रमांक ७४४/२०१८ प्रकरणी होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रस्तुत निकालाची कार्यवाही करण्यात येत आहे.

५. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-'क' पदासाठी निश्चित केलेली क्रीडाविषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दि.११ एप्रिल, २०१८ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व त्यासंदर्भातील उक्त दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

६. प्रस्तुत परीक्षेच्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांनी "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्र. ३.८ पहावी).

८. सदर निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८ मार्च, २०१९**

**उपसचिव (परीक्षा-२)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**